# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

Email Id- recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com Website- https://nmcnagpur.gov.in


आस्थापना क्र - ४०६८ दिनांक : 23/09/2026

## सूचनापत्र-१०

**विषय** :- जाहिरात क्र. ३९९/पी.आर., दिनांक २२.०८.२०२५ अन्वये (Stenographer) पदासाठी दिनांक ०३.१०.२०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या 80 गुणांच्या व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षेबाबत.

**संदर्भ** :- जाहिरात क्र. ३९९/पी.आर., दिनांक २२.०८.२०२५

जाहिरात क्र. ३९९/पी.आर., दिनांक २२.०८.२०२५ अन्वये (Stenographer) पदासाठी दिनांक 08.10.2025 रोजी १२० गुणांची ऑनलाईन CBT परीक्षा घेण्यात आलेली आहे. सदर परीक्षेच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांची पुढील टप्प्यातील ८० गुणांची व्यावसायिक कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षा दिनांक ०३.१०.२०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील :-

**महत्त्वाच्या सूचना :**

१. सदर व्यावसायिक कौशल्य चाचणी एकूण ८० गुणांची असून उमेदवारांनी मराठी व इंग्रजी दोन्ही विषयांच्या परीक्षा देणे बंधनकारक आहे. दोन्ही विषयांकरीता प्रत्येकी ८० गुणांची परीक्षा घेण्यात येईल, गुणपत्रिकेत प्रत्येक विषयाचे ८०/२ = ४० असे दोन्ही विषयांचे मिळून ८० पैकी प्राप्त गुण देण्यात येतील. दोन्ही विषयांच्या परीक्षा एकाच सत्रात घेण्यात येतील त्यामुळे दोन्ही विषयांच्या परीक्षा दिल्याशिवाय उमेदवारांनी परीक्षा कक्ष सोडू नये.

२. उमेदवारांनी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर, निर्धारित वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३. परीक्षेसाठी येताना प्रवेशपत्रासोबत आवश्यक नजीकच्या कालवधीतील फोटो असलेले ओळखपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

४. परीक्षेसंबंधी प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या इतर सर्व सूचना उमेदवारांना बंधनकारक राहतील.

**टीप** : परीक्षेचा दिनांक, परीक्षा केंद्र, वेळ व इतर आवश्यक माहिती प्रवेशपत्रामध्ये नमूद करण्यात येईल

सहा.आयुक्त (साप्रवि)
महानगरपालिका, नागपूर